# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 08/07/2021 (गुरूवार)

(सायंकाळ)

---

### अकस्मात मृत्यू

1) पो.स्टे. मौदा :– अंतर्गत दिघोरी काळे येथे दिनांक 07/07/2021 चे 05.00 वा. दरम्यान संजय राजहंस चौधरी (मृतक) वय 10 वर्ष रा. दिघोरी काळे ता. कामठी जि नागपूर हा खेळायला गेला असता दिघोरी (काळे) शिवारातील रेल्वेचा काम सुरू असलेल्या पाण्याच्या गडडयामध्ये पडला. त्यावरून फिर्यादी हे लगेच घटनास्थळी आले व गडडयामध्ये पाणी साचलेला असल्याने त्यामधील जे.सी.पी पाणी काढले व गडयातुन त्यास बाहेर काढले. त्याच्या अंगावर कपडे नव्हते त्याचे कपडे गडयाच्या बाहेर काठावरती मिळून आले. त्याला बाहेर काडले असता तो मृत अवस्थेत आढळुन आला. मृतक हा गावातील मुलांसोबत पोहायला गेला होता व पोहता पोहता त्या पाण्यामध्ये बुडुन मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– राजहंस बाबुरावजी चौधरी, वय 36 वर्ष रा. दिघोरी काळे ता. कामठी जि नागपूर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. मौदा येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस हवालदार प्रशांत काळे हे करीत आहे.

2) पो.स्टे. देवलापार :– अंतर्गत 15 कि. मी. मौजा सवंदनी शिवार येथे दिनांक 07/07/2021 चे 13.00 वा. दरम्यान कु. मैदी विक्रम सलामे वय 19 वर्ष रा. सवंदनी हि आपले स्वताचे शेतामध्ये धानाचा परा लावत असतांना तिचे डाव्या पायाच्या अंगठयाच्या वर सापाने चावा घेतला. तिला उपचाराकरिता ग्रामीण रुग्णालय देवलापार येथे नेले असता उपचारा दरम्यान डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– गयानीराम सुरजलाल धुवे, वय 44 वर्ष, रा. सवंदनी यांचे रिपोर्टवरुन पो. स्टे. देवलापार येथे कलम 174 जाफौ. कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक मोरेश्वर नागोसे 8600655085 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष

नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर